Accredited by NAAC With 'A' Grade
Approved by AICTE, New Delhi & Affiliated to Shivaji University, Kolhapur
Near Chitranagari, Kolhapur - 416013 (MS)
DTE INSTITUTE CODE : EN-6288
Tel.No.: (0231) 2638893, 2638894, Fax : 2636050
Web : http://coekolhapur.bharatividyapeeth.edu E- mail : coekolhapur@bharatividyapeeth.edu

FOUNDER CHANCELLOR
Dr. Patangrao Kadam
M.A., LL. B., Ph. D.

PRINCIPAL
Dr. Vijay Ghorpade
M.E., Ph. D. (Computer)

# Dr. Patangrao Kadam Saheb Jayanti

Dr. Patangrao Kadam Saheb Jayanti was celebrated on 8$^{th}$January 2022 in college campus. All Teaching, non-teaching staff members and students paid tribute to our beloved Founder Chancellor Dr. Patangrao Kadam Saheb, a great Educationist, Visionary, and Leader, on his birth anniversary.



लोकमत

# डॉ. पतंगराव कदम एक अक्षय प्रेरणा केंद्र



महाराष्ट्राचे माजी महसूलमंत्री, भारती विद्यापीठाचे संस्थापक स्व. पतंगराव कदम यांची आज जयंती... त्यानिमित्ताने त्यांच्या शैक्षणिक कार्यावर टाकलेला हा प्रकाश...

बहुजन समाजासाठी रचनात्मक कार्य करण्याची डॉ. पतंगराव कदम साहेबांची आंतरिक ऊर्मी हे १० मे १९६४ रोजी 'भारती विद्यापीठ' या मोठ्या नावाच्या दहा बाय दहाच्या खोलीत सुरुवात केलेल्या संस्थेचे मूळ होय. संस्था उभारणीसाठी, निधी उभारण्यासाठी 'इंग्रजी' व 'गणित' या विषयांच्या बाह्यपरीक्षा घेण्याचा निर्णय, त्यांच्या निःस्वार्थी सहकाऱ्यांची साथ, महाराष्ट्रभरातील शाळांत या परीक्षांचा प्रसार, त्यासाठी साहेबांनी उपसलेले कष्ट हे १९ व्या वर्षी एक ध्येयासक्त तरुण काय करू शकतो, हे पाहून आपण स्तिमित होतो.

भारती विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पहिल्या शाळेची - शंकरराव मोरे विद्यालयाची स्थापना, त्याच्या इमारतीसाठी यशवंतराव मोहित्यांच्या पुस्तकाचे भाषांतर करून त्यांच्या विक्रीतून निधी जमा करणे, आजारी शिक्षण संस्था भारती विद्यापीठाच्या कक्षेत आणून त्यांना सबल करणे हे उभारणीचे टप्पे त्यांनी परिश्रमपूर्वक पार केले. मुंबई-पुणे विद्यापीठाच्या सिनेटवरील सदस्य म्हणून त्यांनी कार्यकाळ गाजविला. महाविद्यालयांची सुरुवात, बहुविद्याशाखीय शैक्षणिक संकुलाची स्थापना, देशाच्या राजधानीतील शैक्षणिक संकुल, अभिमत विश्वविद्यालयाचा दर्जा हा झंझावात अटकेपार गेला.

साहेबांच्या भाषणांतून त्यांची कार्यशैली, त्यामागची भूमिका, राजकीय चातुर्य, रांगडा स्वभाव या पैलूंचे दर्शन घडते. राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील राजकीय नेते, विविध क्षेत्रातील मान्यवर, काही ट्रस्टद्वारे सुरू केलेले पुरस्कार आणि त्यांचे सन्मानार्थी, पूर, दुष्काळ, चारा छावण्या अशा नैसर्गिक आपदांमध्ये मदत करणारे साहेब अशा नानाविध रूपांत साहेबांचे कार्य होते.

देखणी ती पाऊले
जी ध्यासपंथे चालती !!
वाळवंटातूनसुद्धा
स्वस्ति पदमे रेखिती !!
अशा या ध्यास पर्वाला
आमचे शतशः प्रणाम !

- **डॉ. विजय राम घोरपडे**, प्राचार्य,
भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोल्हापूर.

# Dr. Patangrao Kadam Saheb Jayanti

Dr. Patangrao Kadam Saheb Jayanti was celebrated on 8th January 2021 in college campus. All Teaching, non-teaching staff members and students paid tribute to our beloved Founder Chancellor Dr. Patangrao Kadam Saheb, a great Educationist, Visionary, and Leader, on his birth anniversary.



लोकमत

# पतंगरावांनी तळागाळातील लोकांना प्रगतीचा मार्ग दाखविला : भोसले

## भारती विद्यापीठात पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाचगाव :** पतंगराव कदम यांनी गतिमान शिक्षणातून समाजपरिवर्तन करीत अखंडपणे समाजासाठी आणि सर्वसामान्य जनतेसाठी वाहून घेतले होते. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून तळागाळातील लोकांना विकासाच्या, प्रगतीच्या मार्गावर आणले. त्यामुळे खऱ्या अर्थाने ते थोर राजकारणी होते, असे प्रतिपादन 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांनी केले. कोल्हापुरातील भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलात शुक्रवारी भारती विद्यापीठाचे संस्थापक, माजी वन, महसूलमंत्री स्व. पतंगराव कदम यांची ७७ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमात भोसले बोलत होते.



कोल्हापुरातील भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुल येथे डॉ. पतंगराव कदम यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी डावीकडून प्राचार्य डॉ. पी. बी. चवाटे, प्राचार्य डॉ. व्ही. आर. घोरपडे, 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे, डॉ. आर. ए. मराठे उपस्थित होते.

भोसले म्हणाले की, लाख मरावे परी लाखांचा पोशिंदा जगावा या उक्तीप्रमाणे डॉ. पतंगराव कदम अनेकांचे आधार व प्रेरणा बनून राहिले. यावेळी त्यांनी पतंगरावांबरोबरच्या अनेक आठवणींना उजाळा देतानाच त्या आठवणी सदैव प्रेरणा देत राहतील, असे सांगितले.

यावेळी भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे म्हणाले की, कोणत्याही क्षेत्रात उतरल्यावर हाती घेतलेले काम हे सर्वोच्च शिखरावर न्यायचे हा पतंगराव कदम यांचा ध्यास होता. त्यातूनच त्यांनी पश्चिम महाराष्ट्रात भारती विद्यापीठाच्या माध्यमातून एक शैक्षणिक साम्राज्य उभे करून त्याचे वटवृक्षात रूपांतर केले.

यावेळी भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट संचालक डॉ. आर. ए. मराठे, भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. पी. बी. चवाटे, भारती विद्यापीठ प्रशालेचे मुख्याध्यापक जे. एस. तांदळे, भारती विद्यापीठ इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका ऊर्मिला शिंदे, बी. वाय. पाटील उपस्थित होते.

Hello Kolhapur
Page No. 3 Jan 10, 2021
Powered by: erelego.com

# Dr. Patangrao Kadam Saheb Punyatithi

On the occasion of punyatithi of Dr. Patangrao Kadam Saheb, Founder Bharati Vidyapeeth, Chancellor Bharati Vidyapeeth (Deemed to be University) and former Minister of Govt.of Maharashtra, all teaching, non-teaching staff members and students assembled on 9th March 2022 in college campus and paid homage to him.







Vijay Ram Ghorpade Digitally signed by Vijay Ram Ghorpade Date: 2023.04.18 15:59:12 +05'30'